आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

१९ मार्च २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- घड्याळ हे पक्षचिन्ह वापरण्याची बाब न्यायप्रविष्ट असल्याचं प्रत्येकवेळी स्पष्ट करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे अजित पवार यांना आदेश
- लोकसभा निवडणुकीसंदर्भात मनसे प्रमुख राज ठाकरे यांची भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांच्याशी चर्चा
- केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यातल्या १६ महापालिकांमधल्या ३४ अधिकाऱ्यांची बदली
- गडचिरोली जिल्ह्यात कोलामार्का जंगलात झालेल्या पोलीस चकमकीत चार नक्षलवादी ठार

**आणि**

- देशातले शेअर बाजार जानेवारीपासूनच्या नीचांकी पातळीवर, सेन्सेक्समध्ये ७३६ अंकांची घसरण

**<><><><><>**

घड्याळ हे पक्षचिन्ह वापरताना हे चिन्ह वापरण्याचं प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचं प्रत्येकवेळी स्पष्ट करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला दिले. प्रत्येक जाहिरात, व्हिडीओ किंवा इतर ठिकाणी, हे लिहिण्याचे आदेश न्यायालयानं दिले. तसंच मराठी, हिंदी आणि इंग्रजी वृत्तपत्रात यासंदर्भातलं निवेदन प्रसिद्धीला द्यायचे निर्देशही न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठानं दिले.

त्याचवेळी लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हे नाव, आणि तुतारी हे पक्षचिन्ह वापरण्याची मुभा न्यायालयानं

दिली आहे. निवडणूक आयोगानं राज्यसभा निवडणुकीपुरतं हे पक्षाचं नाव आणि पक्षचिन्ह वापरण्याची मुभा शरद पवार यांना दिली होती. या निकालाला शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यावर आज झालेल्या सुनावणीत न्यायालयानं हे आदेश दिले. तुतारी हे चिन्ह शरद पवार यांच्या पक्षाव्यतिरीक्त इतर कुणालाही न देण्याचे आदेशही न्यायालयानं निवडणूक आयोगाला दिले.

<><><><>

लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आज सकाळी नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची भेट घेतली. यासंदर्भात सकारात्मक चर्चा झाली असून काही दिवसात पुन्हा एक बैठक होईल आणि त्यानंतर निर्णय जाहीर होईल, अशी माहिती मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली. मनसेनं किती जागा मागितल्या याविषयी अधिक माहिती द्यायला त्यांनी नकार दिला मात्र पक्षानं आदेश दिला त्या जागेवरुन निवडणूक लढायला तयार असल्याचं ते म्हणाले.

राज ठाकरे महायुतीमध्ये सहभागी झाले तर त्यांचं स्वागत आहे, अशी प्रतिक्रिया भाजपाच्या अनेक नेत्यांनी दिली आहे.

<><><><>

केंद्रीय निवडणूक आयोगानं दिलेल्या निर्देशानुसार राज्य सरकारनं १६ विविध महापालिकांमधल्या ३४ अधिकाऱ्यांची बदली केली आहे. अतिरीक्त आयुक्त आणि उपायुक्त दर्जाचे हे अधिकारी आहेत. नागपूर, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, कोल्हापूर, सांगली-कुपवाडा यासह इतर महापालिकातल्या अधिकाऱ्यांचा यात समावेश आहे. या अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यमुक्त होण्याचे आदेश सरकारनं दिले असून नव्या पदस्थापनेचे आदेश नंतर दिले जाणार आहेत.

**<><><><>**

शिवसेनेच्या खासदारांची बैठक आज मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातल्या घरी झाली. एक-दोन दिवसात जागावाटपाचा निर्णय जाहीर होईल, अशी माहिती पक्षाचे लोकसभेचे नेते राहुल शेवाळे यांनी दिली. पक्षाच्या वतीनं निर्णय घेण्याचे सर्व अधिकार एकनाथ शिंदे यांना दिले असून लवकरच पक्षाच्या उमेदवारांची यादी जाहीर होईल, असं ते म्हणाले.

**<><><><>**

आमचे हिंदुत्व हे राष्ट्रीयत्वाचं आहे, तर भाजपाचं हिंदुत्व इतर धर्मियांचा द्वेष करणारं आहे, अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. त्यांनी आज नांदेड, तसंच यवतमाळ जिल्ह्यात उमेरखेड इथं आयोजित संवाद मेळाव्यांमधे ही भूमिका स्पष्ट केली. शेतकरी आंदोलनाला अराजक म्हणणारं संघ - भाजपाचं हिंंदुत्व आपल्याला मान्य नाही, असं ते म्हणाले. आपल्यावर हिंदुत्व सोडल्याचा आरोप भाजपाकडून केला जातो, मात्र याउलट भाजपाला सोडल्यानंतर आता तुम्ही शुद्ध झाला आहात अशा प्रतिक्रिया सामान्य जनतेतून येत आहेत, असंही ते म्हणाले.

भाजपाला आता सत्तेचा हव्यास सुटला आहे. सत्तेच्या दुरुपयोगातून पैसा आणि त्यातून पुन्हा सत्ता, हेच भाजपाचं धोरण असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला. आगामी निवडणुकीत कार्यकर्त्यांनी भाजपाचा २०१४ च्या आणि २०१९ च्या निवडणुकीचा जाहीरनामा घेऊन, त्यात दिलेली आश्वासनं पूर्ण झाले आहेत का याबाबत जनतेला विचारावं, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><>**

महाविकास आघाडीतल्या २ प्रमुख पक्षांवरचा आपला विश्वास उडाला असला, तरी काँग्रेसला मात्र ७ लोकसभा मतदारसंघामधे पाठिंबा देणार असल्याचं वंचित बहुजन आघाडीनं स्पष्ट केलं आहे. याबाबत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांना पत्र लिहिलं आहे. आपल्या पक्षाला न बोलवता आघाडीच्या बैठका आणि चर्चा होत आहे. ज्या बैठकांना बोलावलं त्या बैठकांमधे आमच्या प्रतिनिधीचं म्हणणं ऐकायला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं नकार दिला. मात्र भाजपा सरकारचा पराभव करणं हाच वंचित बहुजन आघाडीचा प्रधान हेतू कायम असल्यानं काँग्रेसला पाठिंबा द्यायचा निर्णय पक्षानं घेतला आहे. त्यामुळे काँग्रेसनं राज्यात लढवणार असणाऱ्या सात मतदार संघांची नावं आपल्याला कळवावीत, असं या पत्रात म्हटलं आहे.

<><><><><>

गडचिरोलीत अहेरी तालुक्यातल्या रेपनपल्लीजवळच्या कोलामार्का जंगलात आज पहाटे झालेल्या पोलीस चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले. यापैकी एकजण नक्षलांच्या तेलंगणा विभागीय समितीचा सचिव तर दुसरा क्षेत्र सचिव होता. दोघांवर ३६ लाखाचे बक्षीस होतं. पोलिसांनी त्यांच्याकडची पिस्तूलं, कार्बाईन आणि इतर, साहित्य ताब्यात घेतलं आहे. या परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र केल्याची माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

<><><><><>

अमेरिकन फेडरल रिझर्व्ह व्याजदराचा निर्णय जाहीर करणार असल्याच्या पार्श्वभूमीवर देशातल्या शेअर बाजारात आज मोठी घसरण झाली. त्यामुळं जानेवारीपासूनच्या निचांकी पातळीवर शेअर बाजारातले निर्देशांक पोहोचले.

सेन्सेक्स ७३६ अंकांनी घसरुन ७२ हजार १२ अंकांवर स्थिरावला तर निफ्टी २३८ अंकांनी घसरुन २१ हजार ८१७ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना उद्या जारी होणार आहे. पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला १७ राज्य आणि चार केंद्रशासित प्रदेशातल्या १०२ जागांसाठी मतदान होणार आहे, यामध्ये महाराष्ट्रातल्या रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघांचा समावेश आहे. याशिवाय तामिळनाडुमधल्या ३९, राजस्थान १२, उत्तर प्रदेश आठ, मध्य प्रदेश सहा, उत्तराखंड आणि आसाममधल्या प्रत्येकी पाच, बिहार चार, पश्चिम बंगाल तीन, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालयमध्ये प्रत्येकी दोन, तर छत्तीसगढ, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा, अंदमान आणि निकोबार, जम्मू काश्मीर, लक्षद्विप आणि पुदुच्चेरी इथल्या प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे. या जागांसाठी उमेदवारांना येत्या २७ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील.

**<><><><><>**

काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीनं आज पक्षाच्या जाहीरनाम्यावर चर्चा केली. या जाहीरनाम्यात शेतकरी, युवक, महिला, कष्टकरी आणि आरक्षण या मुद्द्यांवर भर दिला जाईल, असं पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटलं आहे. जाहीरनाम्याच्यासंदर्भात पूर्ण निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारिणीनं खर्गे यांना दिल्याची माहिती राष्ट्रीय सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी दिली.

नवी दिल्लीत झालेल्या या बैठकीत माजी अध्यक्ष सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी, पी. चिदंबरम यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते सहभागी झाले होते.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयानं रामनारायण गुप्ता उर्फ लखन भैय्या याच्या कथित बनावट चकमकीच्या १८ वर्ष जुन्या प्रकरणात, मुंबईचे माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. यापूर्वी मुंबईतल्या सत्र न्यायालयानं या प्रकरणी त्यांना निर्दोष ठरवलं होतं. त्या निकालात दोषी ठरलेले १३ पोलिस कर्मचारी आणि एका नागरिकाची जन्मठेपेची शिक्षाही उच्च न्यायालयानं कायम ठेवली आहे.

**<><><><><>**

यवतमाळच्या चिलगव्हाणचे शेतकरी साहेबराव करपे यांनी १९८६ ला आजच्याच दिवशी नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केली होती. या घटनेच्या स्मृतीप्रित्यर्थ ठिकठिकाणी आज प्रतिकात्मक अन्नत्याग आंदोलनं करण्यात आली.

**यवतमाळ**मध्ये किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने दरवर्षी या दिवशी उपोषण केलं जातं. यावर्षीही विविध संघटना आणि नागरिकांनी एक दिवसाचं उपोषण केलं.

**<><><><><>**

लोकसभेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या आचारसंहितेच्या कालावधीत केल्या जाणाऱ्या संशयास्पद व्यवहारावर बँकांनी लक्ष ठेवावं, असे निर्देश सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी तसंच जिल्हा दंडाधिकारी किशोर तावडे यांनी आज सर्व बँकांच्या अधिकाऱ्यांना दिले. ते आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात घेतलेल्या बँक अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत बोलत होते.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकांच्या आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या फोंडाघाट इथल्या तपासणी नाक्यावर सुरु असलेल्या तपासणी दरम्यान एका वाहनात आढळलेली १० लाख रुपयांची रोख रक्कम पोलिसांनी आज जप्त केली. आयकर विभागाकडून या रकमेची तपासणी करून त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात विदर्भात काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह वादळाची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. काही ठिकाणी गारपीट होण्याची देखील शक्यता आहे.

येत्या २-३ दिवसात कोकणाच्या काही भागात उष्ण आणि दमट परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.

**//<><><><><>//**